D/navin file/all file/ zankar sir

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
आयुक्त कक्ष
क्र.आ.क./कावि/७८४/२०१६
दि.११/११/२०१६

विषय :- विकास कामांचे मुदतवाढी बाबत.

परिपत्रक

पिंपरी चिंचवड मनपाचे स्थापत्य, पा.पु व जनि, विद्युत, पर्यावरण, झो.नि.पु., वाहतुक, BRTS प्रकल्प, क्षेत्रीय कार्यालये इ. विभागामार्फत विकास कामे तसेच देखभाल दुरूस्तीची कामे केली जातात. बहुतांशी कामे कार्यारंभ आदेशातील कामाचे मुदतीनुसार निर्धारित दिनांकास पुर्ण होत नाहीत. यासाठी निरनिराळी कारणे दिली जातात. तथापि, मुदतीत पुर्ण न होणा-या अशा कामांसाठी कामाची मुळ मुदत संपणेपुर्वीच विलंबाचे कारणांचा विचार करुन कामांस मुदतवाढ मंजुर / नामंजुर करणे अपेक्षित आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की, कामांची मुळ मुदत संपलेनंतरही कामास आवश्यकतेनुसार मुदतवाढ न देता अशा कामांची बीले, मुदतवाढीसाठी बीलाचे १% रक्कम राखून ठेवून, अदा करणेसाठी लेखा विभागाकडे पाठविली जातात. सदरची पध्दत चुकीची असून, १% रक्कमेस कुठलाही नियमाचा आधार दिसून येत नाही.

सबब, ज्या कामांमध्ये मुदतवाढ देणे संबधित विभागास आवश्यक वाटते, अशा कामांची कोणतीही बीले लेखा विभागाकडे अदायगीसाठी पाठविताना मुदतवाढ मंजुर केलेचे प्रस्तावासहच पाठवावित, मुदतवाढ मंजुर नसलेली बीले लेखा विभागास मंजुर करता येणार नाहीत. यास्तव मंजुर निविदा रक्कम रू.१ कोटी चे पुढील कामांच्या मुदतवाढीचे प्रस्तावांना आयुक्तांची मान्यता घेण्यात यावी. व रक्कम रु. १ कोटी चे आतील मंजुर निविदा रक्कमेच्या कामांचे मुदत वाढीचे प्रस्तावांना, कार्यारंभ आदेशातील मुळ मुदतीचे २५% कालावधी पर्यंत मुदतवाढ देण्यास संबंधीत विभाग प्रमुख सक्षम राहतील. त्यापुढील कालावधीचे मुदत वाढीचे प्रस्तावांना आयुक्तांची मंजुरी घेणेत यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८

प्रति,

सर्व संबधित शाखाप्रमुख -------------------- विभाग